बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक २१४ ▪ शुक्रवार, दि. १२ डिसेंबर, २०२५ ▪ पोस्टल दिनांक १३ डिसेंबर, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-214 ▪ Friday 12 December, 2025 ▪ Postal Date 13 December, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

# आ.सुरेश धस म्हणाले उठायचं सुटायच आणि इज्जती घ्यायच्या; राम खाडे अन् मंदिर जमीन प्रकरणात जयंत पाटील अन् सुरेश धसांमध्ये सभागृहात कोपरखळ्या!

सायं.दैनिक
www.beedkisan.in
बीड किसान
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN




बीड । किसान न्युज

**आ. जयंत पाटील आणि आ. सुरेश धस या दोघांमध्ये काल गुरुवारी विधिमंडळ सभागृहात चांगलाच कलगीतुरा रंगलेला दिसून आला. आ. जयंत पाटील यांनी हिंदू देवस्थान जमीन हडपल्याचा मुद्दा उपस्थित करून त्या विरोधात कोर्टात दाद मागणाऱ्यांवर प्राणघातक हल्ले होत असल्याचा प्रश्न उपस्थित केला. नुकतेच बीड जिल्ह्यातील आष्टी येथील राम खाडे यांच्यावर हल्ला झालेला असल्याने आ. सुरेश धस यांनी उभे राहून यावर बोलताना चौकशीची मागणी केली. यामुळे या दोघांमध्ये चांगलाच कलगीतुरा रंगलेला दिसून आला. या प्रकाराची राज्यभर जोरदार चर्चा सुरू झाली आहे.**

नागपूर येथे सध्या हिवाळी अधिवेशन सुरू असून, सत्ताधारी अन् विरोधकांच्या आरोप प्रत्यारोपांमुळे हिवाळा असला तरी वातावरण चांगलेच तापलेले दिसत आहे. काल गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाचे जेष्ठ नेते आ.जयंत पाटील यांनी मंदिरांच्या जागा काही ट्रस्टिंनी हडप केलेल्या असून, त्या विरोधात कोर्टात दाद मागणाऱ्यांवर जिवघेणे हल्ले होत आहेत. १५ भरादिवसापूर्वी नगर जिल्ह्यात एकावर हल्ला झाला असल्याचा प्रश्न उपस्थित केला. यावर संतप्त होत आ. सुरेश धस यांनी या खिदमत माश, मदत माश जमीन केवळ एका मतदारसंघात नसून सर्वत्र आहेत. मारहाणीचा प्रश्न याची चौकशी करण्यात यावी म्हणून मी स्वतः एसपींना पत्र दिले आहे. या घटनेशी माझा काहीही संबंध नाही असे म्हणत हा आरोप फेटाळून लावला आहे. आ. धसांनी उत्तर देताच आ. जयंत पाटील यांनी ही त्यावर व्यक्त होत मी हिंदू देवस्थान जमिनींचा प्रश्न उपस्थित केला. त्यामध्ये कोणाचेही नाव घेतले नाही. पण आ. धस स्वतः उभे राहून व्यक्त होत स्वतः च्या अंगावर ओढून घेण्याचा उत्तम नमुना आहे. असे सांगत मी तुमच्यावर आरोपच केला नाही तर इतकी गडबड का कराताय? तुम्ही परिपक्क आहात, तुमचा संबंध नाही तर व्यक्तच व्हायच नाही. तुमच्यावर आरोप करणार आहे तेंव्हा बघू असे म्हणत आ. जयंत पाटील यांनी चांगलीच कोपरखळी मारली. हे पाहता काल विधिमंडळ सभागृहात चांगलाच कलगीतुरा रंगलेला या दोन आमदारांमध्ये दिसून आला. यामुळे येथे थंडीत ही वातावरण तापल्याचे दिसून आले. या रंगलेल्या कलगीतुऱ्याची राज्यभर चर्चा सुरू झाली आहे.

# ऊर्जा स्थान मुंडे साहेब



कामरान शेख

नाथरा या छोट्याशा खेड्यात १२ डिसेंबर १९४९ ला जन्म झाला. कुणालाच कल्पना नव्हती की, हा साधा, सोज्वळ मुलगा पुढे महाराष्ट्राच्या हृदयात अढळपणे स्थान मिळवेल. आई-वडिलांच्या कष्टातून वाढलेलं हे नेतृत्व घरची परिस्थिती कठीण पण मनात स्वप्न मात्र मोठी. गावकुसाच्या पलीकडे जाऊन हजारो-लाखो लोकांचा आधार बनण्याचे स्वप्न आणि हेच स्वप्न त्यांनी पूर्ण केले. आयुष्याचा एकेक क्षण लोकांसाठी जगून. मुंडे साहेबांविषयी बोलताना आजही अनेकांच्या गळा दाटून येतो. कारण त्यांच्याबद्दल बोलणे म्हणजे स्वतःच्या आयुष्यातील एखाद्या जवळच्या व्यक्तीची आठवण काढणे आहे. ते नेता होते पण माणूस म्हणून जास्त मोठे होते. त्यांच्या चेहऱ्यावरची ती ओळखीची स्मितरेषा, तो मधुर आवाज, एखाद्या शेतकऱ्याच्या अंगावर हात ठेवत दिलासा देण्याची त्यांची पद्धत आजही डोळ्यासमोर उभी राहते. राजकारण हे त्यांच्यासाठी केवळ सत्तेचे माध्यम नव्हते; ते सेवेचे साधन होते. गरीबाच्या घरची अंधारी रात्र उजळवण्यासाठी दिवसभर धावणारा, स्वतःचा आराम, विश्रांती, झोप सगळं बाजूला ठेवून जनतेसाठी जगणारा असा नेता विरळच. विधानसभेत विरोधी पक्षनेते असताना त्यांनी झोप मोडून अभ्यास केला, प्रत्येक प्रश्न मांडताना सामान्यांच्या वेदना आवाजात आणल्या. उपमुख्यमंत्री असताना राज्याच्या सुरक्षेसाठी आणि प्रशासनासाठी घेतल्या कठोर निर्णयांत त्या धडाडीच्या लोकनेत्याचा आत्मविश्वास दिसायचा. बीड जिल्हा तर त्यांच्या जीवनश्वासाचाच भाग होता. २०१४ साली दिल्लीमध्ये ग्रामीण भारतासाठी मोठी स्वप्ने घेऊन ते उभे राहिले होते. किती योजना, किती संकल्पना परंतु नियतीने अचानक अशी वळण घेतली की संपूर्ण महाराष्ट्र थरारला. ३ जून २०१४ ची ती सकाळ आजही अनेकांच्या डोळ्यांत पाणी आणते. एकच प्रश्न का इतक्या लवकर ते निघून गेले? काळाने शरीर हिरावून घेतले, पण त्यांच्या आठवणी नाही. गावोगावच्या चौकात, शेतातील बांधावर, कार्यकर्त्यांच्या मनात, राजकीय चर्चांमध्ये- आजही तेच नाव घुमतं: गोपीनाथराव! त्यांचे चालणे, बोलणे, लोकांना जवळ घेण्याची शैली, आजही कार्यकर्ते अनुकरण करतात. पंकजाताई आणि डॉ.प्रितम ताईंमध्ये आजही त्या जननेत्याचा तेजस्वी वारसा दिसतो. त्यांच्या कार्याची ऊर्जा आजही मराठवाड्याच्या मातीला उब देते. आज जयंतीदिनी जेव्हा आपण त्यांच्या छायाचित्राकडे पाहतो, तेव्हा भावना एका क्षणात डोळ्यांतून बाहेर येतात. त्या चित्रातील त्यांच्या डोळ्यांत आजही तीच ऊब, तीच प्रेरणा, तेच प्रेम दिसते. जणू तेच सांगतायत मी आज इथे नसूनही, तुमच्यातच आहे. लोकांसाठी लढा, त्यांच्यासाठी जगा. गोपीनाथ मुंडे हे नाव आता इतिहास नाही ते जिवंत प्रेरणा आहे, धडाडीचा ध्वज आहे, मराठवाड्याच्या मनात कोरलेली भावना आहे. या महान लोकनेत्याला जयंतीदिनी कोटी कोटी प्रणाम त्यांच्या स्मृतीतील प्रकाश आजही आपल्या मार्गाला उजळत राहील.

# देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन



लातूर । किसान न्युज

देशाचे माजी गृहमंत्री मा शिवराज पाटील चाकूरकर यांचे लातूर येथे देवघर या त्यांच्या निवासस्थानी आज सकाळी दुःखद निधन झाले. अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली आहे ते ९२ वर्षाचे होते. त्यांनी काँग्रेस राजवटीमध्ये भारताचे सभापती म्हणून काम पाहिले त्यांच्याच कालावधीमध्ये भारताच्या लोकसभेचे टीव्ही वरती प्रसारण सुरू झाले.

त्यानंतर काँग्रेस राजवटीतच देशाचे गृहमंत्री राहिले अंतिम टप्प्यात त्यांनी देशाचे महत्त्वपूर्ण राज्य असणाऱ्या पंजाब राज्याचे राज्यपाल म्हणून काम पाहिले माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या वरती उद्या दि १३ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता लातूर येथील वरवंटी परिसरात असणाऱ्या त्यांच्या मालकीच्याशेतामध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने देण्यात आली आहे. त्यांच्या पश्चात मुलगा शैलेश सून भाजप नेत्या सौ अर्चनाताई पाटील चाकूरकर नातवंडे असा परिवार आहे...- शिवराज पाटील चाकूरकर : सहा दशकांच्या » पान २ वर

# केज तालुक्यातील बांधकाम कामगारांचे वर्षभरापासून रखडलेले नुतनीकरण पूर्ण

## दैनिक किसानचे वृत्त अन् आ. नमिता मुंदडा यांनी लक्ष घातल्याने प्रश्न सुटल्याने बांधकाम कामगारांमध्ये समाधान

बीड । किसान न्युज

केज तालुक्यातील बांधकाम कामगारांचे मागील वर्षभरापासून नुतनीकरण रखडले होते. याप्रकरणी दैनिक किसानने वृत्त प्रकाशित केले होते. तसेच आ. नमिता मुंदडा यांनी ही याची गंभीर दखल घेऊन कामगार मंत्री आकाश फुंडकर, सचिव यांना पत्र दिले. याची दखल घेऊन अधिकाऱ्यांनी गुरुवारी (दि.११) सर्वच रखडलेल्या अर्ज निकाली काढून नुतनीकरण पूर्ण केले. यामुळे बांधकाम कामगारांमधून समाधान व्यक्त करीत आ. नमिता » पान २ वर




# मल्टीस्टेट प्रकरणी ठेवीदार संघर्ष समिती पुन्हा आक्रमक



## जप्त मालमत्तांच्या लिलावाची तारीख जाहीर करा म्हणत धरणे आंदोलन सुरू

बीड । किसान न्युज

जिल्ह्यातील अनेक मल्टीस्टेट सोसायट्या बंद पडून त्यामध्ये लाखो ठेवीदारांचे कोट्यावधी रुपये अडकून पडले आहेत. या मल्टीस्टेटच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. पण याचे लिलाव कधी होणार याची प्रतिक्षा असून, प्रा. सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली ठेवीदार संघर्ष समिती आक्रमक झाली आहे. आज शुक्रवार (दि.१२) पासून मालमत्ता लिलावाची तारीख जाहीर करा या प्रमुख मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय समोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. बीड मधील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट, » पान २ वर


# राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८-डी अंबाजोगाई शहरासाठी नवीन बायपास रस्ता मंजूर करा



## आ.नमिता मुंदडा यांची मागणी

अंबाजोगाई । किसान न्युज

राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८-डी अहमदपूर ते पाटोदा या महामार्गावर अंबाजोगाई शहरासाठी नवीन बायपास रस्ता मंजूर करण्यात यावा अशी मागणी आ. नमिता मुंदडा यांनी केंद्रीय रस्ते व वाहतूक यमंत्री ना. नीतीन गडकरी यांच्या कडे एका निवेदनाद्वारे केली आहे. या संदर्भात ना. नितीन गडकरी यांना देण्यात आलेल्या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८-डी पाटोदा ते अहमदपूर हा महामार्ग माझ्या केज विधानसभा मतदार संघातील अंबाजोगाई शहराच्या मध्यभागातून जातो, अंबाजोगाई शहराची लोकसंख्या एक लाखाच्या वर असून आजूबाजूच्या खेड्यातून रोजगारासाठी सदर ठिकाणी नागरिक येत असल्याने तसेच या ठिकाणी प्रसिद्ध योगेश्वरी देवीचे मंदिर असल्याने महाराष्ट्रातून भाविक भक्त » पान २ वर




स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट 130,500
२२ कॅरेट 126,000
चांदी प्रतिकिलो 192,000

# मराठवाड्यातील मदत माश, खिदमत माश जमीन प्रश्नाकडे आ.सुरेश धसांनी सभागृहाचे लक्ष वेधले

आष्टी । किसान न्युज

**नागपूर येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात गुरुवारी (दि.११) आमदार सुरेश धस यांनी मराठवाड्यातील मदत माश आणि खिदमत माश जमिनींच्या मुक्ततेचा प्रलंबित प्रश्न जोरदारपणे मांडत सभागृहाचे याकडे लक्ष वेधले. आ. धस म्हणाले की, या महत्त्वपूर्ण विधेयकाद्वारे मराठवाड्यातील तब्बल ७ लाख ४३ हजार हेक्टर मदत माश आणि सुमारे ४ लाख ५० हजार हेक्टर खिदमत माश जमिनींच्या मुक्ततेचा मार्ग मोकळा होत आहे.**

हा कोणत्याही एका मतदारसंघाचा किंवा तालुक्याचा प्रश्न नाही; संपूर्ण मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतील लाखो नागरिकांच्या जीवनाशी संबंधित विषय आहे असे ते म्हणाले. जमिनींच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर भाष्य करताना त्यांनी निजामकालीन नोंदी, सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी केलेल्या शिफारसी, तसेच विविध समाजांच्या विस्तृत जमिनी या नोंदींत कशा गुंतल्या गेल्या याचे » पान २ वर



## कोणीही लोकप्रतिनिधींवर आरोप करणे चुकीचे : धस

**मदत माश, खिदमत माश जमिनींच्या मुद्यावर बोलताना आमदार सुरेश धस यांनी विरोधकांवर कठोर शब्दांत टीका केली. ते म्हणाले, कोणीही लोकप्रतिनिधीवर आरोप करायला सुरुवात केली. भांडण एकाचं आणि आरोप दुसऱ्यावर! घटनेला पंधरा दिवस झाले, एकही पुरावा मिळालेला नाही. मी कोणत्याही चौकशीला सामोरे जाण्यास तयार आहे. ते पुढे म्हणाले, उठसूट सोशल मीडियाचा वापर करून लोकप्रतिनिधीची बदनामी करणे चुकीचे आहे.**